महाराष्ट्र शासन

## जिल्हा मराठी भाषा समिती, कोल्हापूर
## जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, कोल्हापूर व
# राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, मराठी विभाग, कोल्हापूर
## यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
# मराठी भाषा गौरव दिन

"मराठी ही समृध्द ऐतिहासिक वारसा असणारी ज्ञान भाषा आहे. मराठी भाषेला अधिक समृध्द बनविण्यासाठी अवधान, अभ्यास व अवलंबन या तीन स्तरावर आपली भाषा आपल्या सोबत असावी." असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक प्रा.डॉ.हिमांशू स्मार्त यांनी केले. राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजमध्ये मराठी विभाग, जिल्हा मराठी भाषा समिती कोल्हापूर व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळावर दि.२७ फेब्रुवारी रोजी आयोजित मराठी भाषा गौरव दिनाच्या कार्यक्रमात 'मराठीला आपण काय दिले ?' अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.डी.कदम म्हणाले की. "आपली मातृभाषा मराठी असल्याचा आपल्या सर्वांना अभिमान आहे. आपल्या भाषेला सातशे वर्षांहून अधिक मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे." यावेळी महाविद्यालयातील प्रा.विष्णू शिंदे लिखित "डांगोरा" या कादंबरीचे प्रकाशन तसेच श्रीमती.संजीवनी तोफखाने, डॉ.सुप्रिया आवारे, डॉ.विनोद कांबळे, डॉ.शशिकांत अन्नदाते, प्रा.गौतम जाधव, श्रीमती.गौरी भोसले, श्रीमती.जयश्री दानवे इ. नामवंत साहित्यिकांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी विचारपिठावर मराठी विभागप्रमुख व उपप्राचार्य प्रा.डॉ.सिंधू आवळे, श्री.प्रसाद कुलकर्णी, श्रीमती. अपर्णा वाईकर आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्रीमती. अपर्णा वाईकर यांनी केले. आभार जिल्हा मराठी भाषा समितीचे निमंत्रित सदस्य श्री.प्रसाद कुलकर्णी यांनी मानले तर सूत्रसंचलन डॉ.महेश रणदिवे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्रा.अंकुश घुले, डॉ.बाबुराव घुरके, प्रा.समाधान बनसोडे श्री.अनिकेत जाधव आदींनी सहकार्य केले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व विभागातील विद्यार्थी, प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**परिणाम/निष्पती**

- विद्यार्थ्यांमध्ये मातृभाषेविषयी प्रेम निर्माण होते.
- विद्यार्थी मातृभाषेतून लेखनास प्रवृत्त होतील.
- विद्यार्थी मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर करतील.

**लाभार्थी**
**७१**







प्रा. डॉ. सिंधू जयवंत आवळे
मराठी, विभाग प्रमुख

राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर

प्राचार्य,
राजर्षी छ. शाहू कॉलेज
कोल्हापूर.